दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ४८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१९ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

मान्सून अंदमानात जोरदार बरसला ....

महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता

दै.रायगड नगरी । मुंबई

अंदमानात मान्सून दाखल झाला असून पावसाने नैऋत्य मान्सून संपूर्ण अंदमान निकोबार बेटे, संपूर्ण अंदमान समुद्र व्यापला आहे. तर मान्सून आता दक्षिण-पूर्व / पूर्व-मध्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांत पुढे सरकला असल्याची माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली आहे. मान्सूनचा आतापर्यंतचा प्रवाह चांगला राहिल्यामुळे यंदा वेळेआधीच मान्सून दाखल झाला आहे.

इतंकच नाहीतर, भारतीय हवामानशास्त्र विभागाने यंदा मान्सून लवकर येण्याचा अंदाज वर्तवला आहे. २७ मेपर्यंत मान्सून भारतीय किनारपट्टीवर पोहोचेल आणि पहिला पाऊस केरळमध्ये पडेल, असं हवामान खात्याकडून सांगण्यात आलं आहे. तर केरळच्या किनार्याजवळ अरबी समुद्राच्या दक्षिणेकडे बहुस्तरीय मध्यम ढग दाटले आहेत. तर गोवा, केरळ आणि तामिळनाडूच्या काही भागांवरही ढगांची चादर पाहायला मिळत आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, पुढील ५ दिवस अंदमान आणि केरळमधील नजिकच्या शहरांमध्ये मुसळधार पाऊस होईल. केरळसह दक्षिण भारतातील काही राज्यांना पावसाने झोडपून काढलेलं असताना महाराष्ट्रातीलही नऊ जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसंच मोसमी पावसाची प्रगती वेगाने होत असल्याने हा पाऊस अंदमान आणि निकोबार बेटांवर धडकून आता पुढे बंगालच्या दिशेने सरकला आहे.

हवामान खात्याकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, दक्षिणेकडील द्वीपकल्प आणि केतल्सच्या किनार्यावर, अरबी समुद्र आणि बेटांच्या क्षेत्रांवर ढगाळ वातावरण आहे. इतकंच नाहीतर मराठवाड्यातील विदर्भाच्या काही भागांतही ढगांचे वातावरण आहे.

राज्यात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही भागात पूर्वमोसमी पाऊस हजेरी लावेल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे.

भाजप नेत्यांना भितीपोटी पनवेलमध्ये पत्रकार परिषद घ्यावी लागते : बबन पाटील

दै.रायगड नगरी । पनवेल

महाविकास आघाडीचे सरकार पाडण्यासाठी भाजप हरतऱ्हेचे प्रयत्न करीत आहे. हिंदू-मुस्लीम जाती-धर्मांमध्ये दंगल घडवण्यासाठी भाजपने मनसेला देखील मैदानात आणले, पण भाजपचा तोही प्रयत्न फसला. महाराष्ट्रात दंगल घडवून अशांतता, अस्थिरता निर्माण करायची आणि राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या प्रयत्नात त्यांना मात्र यश मिळत नाही. मुंबईमध्ये पत्रकार परिषद घेण्याचे सोडून त्यांना पनवेलला का यावे लागते; याचाच अर्थ माधव भंडारी यांना पनवेलच्या बाबतीत भीती वाटते असेच दिसत आहे. त्यातच किरीट सोमय्या हे देखील उठसुठ पनवेलमध्ये येऊन पत्रकार परिषदा घेतात. याचा अर्थ भाजपच्या नेत्यांना पनवेलमध्ये काहीतरी अडचण वाटते, असे सडेतोड उत्तर शिवसेना जिल्हासंपर्कप्रमुख बबनदादा पाटील यांनी माधव भंडारींच्या टीकेला दिले.

मंगळवारी (दि.१७ मे) संध्याकाळी कळंबोलीमध्ये प्रसाद रंगिले उर्फ गोलू यांच्या मित्रमंडळातर्फे बबनदादा पाटील यांची जिल्हासंपर्क प्रमुख पदी नियुक्ती झाल्याबद्दल जाहीर सत्कार समारंभ आयोजित केला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, नगरसेवक रवींद्र भगत, गोपाळ भगत, शिवसेना महानगर संघटक ऍड. प्रथमेश सोमण, विजय भोईर, गोवारी, डी एन मिश्रा, हरपिंडर वीर सिंग आदी मान्यवर उपस्थित होते.

गेल्या दोन अडीच वर्षांच्या कठीण काळात महाविकासआघाडी सरकारने कोरोनासारख्या महाभयंकर रोगावर यशस्वीपणे मात केली. चक्रीवादळ, महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीवरही मात केली. कोरोनाकाळात महाविकास आघाडी सरकारने गोरगरिबांना मोफत अन्नधान्य दिले. त्याउलट भाजपने काय दिले? तर केवळ आरोप केले. कोरोना काळात महाराष्ट्राच्या जनतेने मदतीसाठी दिलेला निधी भाजपने केंद्रासाठी दिला. असे असताना कोणत्या नैतिकतेने तुम्ही महाविकास आघाडी सरकारवर आरोप करता? असा सडेतोड पलटवार शिवसेना जिल्हासंपर्कप्रमुख बबनदादा पाटील यांनी भाजप प्रवक्ते माधव भंडारी यांनी केलेल्या टिकेवर केला.

यानिमित्ताने माधव भंडारी यांना हे सांगू इच्छितो की, आगामी निवडणुकांमध्ये भाजपला संपूर्ण रायगड जिल्ह्यातून हद्दपार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. महाराष्ट्रात केंद्र सरकारच्या माध्यमातून महाविकास आघाडीच्या नेत्यांवर सूडबुद्धीने ईडीच्या कारवाया केल्या जात आहेत. अलिबागमध्ये मुख्यमंत्री ...//२

शासकीय इमारतीवरील पत्र्याची, कौलांची दुरवस्था

पावसाळ्यात संगणक, महत्त्वाची कागदपत्रे भिजण्याचा धोका

दै.रायगड नगरी । उरण

उरण पंचायत समितीच्या इमारतीवरील पत्र्याची दुरवस्था झाली आहे.उरण नगर परिषदेच्या इमारतीवरील कौलांची दुरवस्था झाली आहे. तसेच इतर इमारतींच्या छताना छिद्र पडल्याने पावसाचे पाणी झिरपून कार्यालयातील संगणक व महत्त्वाची कागदपत्रे भिजण्याचा धोका निर्माण झाला आहे. तरी प्रशासनाने पावसाळ्यापूर्वी सदर इमारतीच्या छतावरील पत्र्याची, कौलांची दुरुस्ती करण्याचे काम हाती घ्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर यांनी आहे.

उरण शहर, तालुक्यातील गावोगावच्या विविध विकास कामांचा आढावा घेण्याचे तसेच सदर विकास कामांना मंजुरी देण्याचे काम हे उरण नगर परिषद व उरण पंचायत समितीमधून केले जात आहे. शहरातील, तालुक्यातील जनमानसांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे ही काम उरण नगर परिषद व उरण पंचायत समिती आणि पोलीस ठाण्यासह इतर शासकीय इमारतीच्या कार्यालयातून केले जात आहे. मागील वर्षीच्या पावसाळ्यात सदर शासकीय कार्यालयात पावसाचे पाणी झिरपत असल्याचे चित्र पहावयास मिळाले होते.त्याचा तास हा शासकीय कार्यालयात कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्यांना व कार्यालयात ये- जा ...//२

०१ जून ते ३१ जुलै २०२२ या कालावधीत मासेमारी बंद

दै.रायगड नगरी । अलिबाग

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत मासेमारी बंदी कालावधी दि.०१ जून ते ३१ जुलै (दोन्ही दिवस धरून ६१ दिवस) करण्याकरिता मत्स्यव्यवसाय विभागाच्या आयुक्तालयाच्या आदेशानुसार चालू वर्षी दि.०१ जून २०२२ ते दि.३१ जुलै २०२२ (दोन्ही दिवस धरून ६१ दिवस) असा मासेमारी बंदी कालावधी घोषित केला आहे.



या कालावधीमध्ये मासळीला प्रजोत्पादनास पोषक वातावरण असते. तसेच या कालावधीत मासेमारी बंदीमुळे मासळीच्या वीजनिर्मिती प्रक्रियेस वाव मिळून मासळीच्या साठ्याचे जतन होते. त्याचप्रमाणे या कालावधीत खराब / वादळी हवामानामुळे होणारी जीवित व वित्तहानी मासेमारी बंदीमुळे टाळता येणे शक्य होते. या आदेशामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे, राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंत) यांत्रिक मासेमारी नौकांना पावसाळी मासेमारी बंदी लागू करण्यात आली असून पावसाळी मासेमारी बंदी ही पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या बिगर यांत्रिकी नौकांना लागू नाही.

राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंत) यांत्रिक मासेमारी नौका पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करताना आढळल्यास/ केल्यास महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), ...//२

संक्षिप्त...

वसंत मोरेंना भेटीची वेळ दिली, न भेटताच राज ठाकरे मुंबईकडे रवाना

दै.रायगड नगरी । पुणे

मनसे अध्यक्ष राज ठाकरे आल्याशिवाय मी पुणे शहर पक्ष कार्यालयात जाणार नाही, असा इरादा स्पष्ट करत आपण पक्षात नाराज असल्याचं मनसे नेते वसंत मोरे यांनी रोखठोकपणे सांगितलं होतं. त्यातच राज ठाकरे २ दिवसांच्या पुणे दौऱ्यावर असल्याने वसंत मोरे यांची राज ठाकरेंशी भेट होणार होती. तशी वेळही राज ठाकरे यांनी वसंत मोरे यांना दिली होती. मात्र भेटीची वेळ देऊनही न भेटताच राज ठाकरे मुंबईकडे रवाना झाले आहेत.अयोध्या दौऱ्यावर जाण्याआधी राज ठाकरे यांची पुण्यात सभा होणार होती. त्याच सभेच्या नियोजनासाठी आणि मनसे पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठीसाठी राज ठाकरे २ दिवसीय पुणे दौऱ्यावर होते. काल निवडक मनसे पदाधिकाऱ्यांना भेटल्यानंतर राज ठाकरेंनी सायंकाळच्या सुमारास पुस्तकं खरेदी केली. आजही सकाळपासून सभेच्या नियोजनासाठी त्यांनी मनसे पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. पण पावसाच्या शक्यतेने त्यांनी आपली सभा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. पुढच्या आठवड्यात इनडोअर सभा घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला. हा निर्णय घेऊन राज ठाकरे मुंबईकडे रवाना झाले. तत्पूर्वी त्यांनी वसंत मोरे यांना भेटीसाठी वेळ दिली होती. मात्र वसंत मोरे यांना न भेटताच राज ठाकरे मुंबईकडे रवाना झाले.

बीडीडी चालीतील पोलीसांना बांधकाम दराने मिळणार घरे : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

दै.रायगड नगरी । मुंबई

नायगाव, एन. एम. जोशी मार्ग आणि वरळी येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाला गती देण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले आहे. या चाळींमध्ये सन २०११ च्या आधीपासून पोलीस सेवा निवासस्थानात राहात असलेल्या पोलीसांच्या कुटुंबियांना बांधकाम दराने ही घरे देता यावीत यासाठी गृहनिर्माण विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. आज मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या निवासस्थानी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पासंदर्भात बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे यांच्यासह मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलींद म्हैसकर, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार सीताराम कुंटे, अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल डिग्गीकर, पोलीस आयुक्त संजय पांडे, पोलीस महासंचालक (गृहनिर्माण) श्री. फणसाळकर उपस्थित होते. त्याचबरोबर आ. सुनिल शिंदे, आशिष चेंबुरकर, श्रीमती श्रद्धा जाधव ...//२

जंगल संपत्तीच्या ऱ्हासामुळे रानमेवा होऊ लागला दुर्मिळ

दै.रायगड नगरी । रोहा

उन्हाळ्याच्या दिवसात तयार होणारा व प्रत्येकाला हवाहवासा वाटणारा रानमेवा मिळविण्यासाठी फार मोठी धडपड करावी लागत आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे जंगल संपत्तीच्या होणाऱ्या ऱ्हासाने ऊन्हाळ्यात जंगल भागात तयार होणारे काजू, फणस, करवंदे, जांभळे, आंबे आदी रानमेवा दुर्मिळ होऊ लागल्याचे समोर आले आहे.

वाढते औद्योगिकरण व शहरीकरणामुळे जंगलाची बेसुमार कत्तल केली जात आहे. दुसरीकडे निसर्गाच्या लहरीपणासह अनादी काळापासून मानवाने इंधन व घरगुती वापरासाठी जंगल संपत्तीची लूट चालविली आहे. त्यात भरीस भर म्हणून जंगलात लावले जाणारे वणवे यामुळे दिवसागणिक जंगलांची संख्या कमी कमी ...//२

रोहा आगार प्रमुख ग्रामीण भागातील प्रवाशांकडे लक्ष देतील काय? परिवाहन मंत्र्यांकडे तक्रार करणार

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

गेल्या अनेक वर्षापासून रोहा आगरातून रोहा (ताम्हाणी मार्गे) स्वारगेट ही एस. टी. महामंडळाची गाड़ी सकाळी ६ वाजता सुटते. अगदी सुरुवाती पासूनच या गाडीला प्रवाशांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. ही गाडी रोहा आगारातून सुटल्यानंतर कोलाड सुतारवाडी विळे - मार्गे स्वारगेटकडे रवाना होते.

पूर्वी सुतारवाडी येथून पुणेकडे जाण्यासाठी प्रवाशांना कोलाड वाहतूक नियंत्रकाकडून रिझर्वेशन मिळायचा आता मात्र तो बंद करण्यात आला आहे. त्यामुळे सुतारवाडीसह सोळा वाड्यांतील प्रवाशांना पुणेकडे जाण्यासाठी दोन ते अडीच तास उभ्याने प्रवास करावा लागत असल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे.

कोलाड येथील वाहतूक नियंत्रक कक्षात आरक्षण मिळत नसल्यामुळे आरक्षण करण्यासाठी पंचवीस ते तीस किमी. प्रवास करुन रोहा येथे जावे लागत आहे. हा मोठा भुर्दंड तर आहेच परतील रोहा येथे सुतारवाडी - पौड स्टँड अशा प्रवासाचे आरक्षण करायला गेल्यानंतर कोलाड ते चांदणी चौक असे सक्तीने आरक्षण प्रवाशांच्या माथी मारले जाते. ज्या ठिकाणी १२० रु. लागतात त्या ठिकाणी १६५ रु. भरावे लागत आहेत. एस. टी. गाड्या प्रवाशांच्या सेवेसाठी आहेत की प्रवाशांची गैरसोय करण्यासाठी असा ज्वलंत प्रश्न प्रवाशांना पडला आहे. या सर्व गोष्टींमुळे अनेक प्रवासी आता खासगी वाहनांकडे वळले आहेत. बहुजन हितास बहुजन सुखाय' हे वाक्य आता लोक विसरू लागले आहेत. रोहा आगार जर प्रवाशांना आर्थिक भुदंड देत असेल तर मंत्र्यांकडे तक्रार देणार असल्याचे अनेक प्रवाशांनी तीव्र शब्दात आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले.

तुम्हाला आरक्षण करायचे असेल ...//२

तालुका समन्वय समितीच्या सभेला गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचे अध्यक्षांचे निर्देश

दै.रायगड नगरी । म्हसळा

म्हसळा तालुका समन्वय आणि पुनर्व्हिलोकन समितीची पहिलीच सभा समितीचे अध्यक्ष नाजीम हसवारे यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समितीच्या सभागृहात संपन्न झाली. याप्रसंगी तहसीलदार समीर घारे, संपदा पोतदार, संतोष पाटील, अनंत पाटील, महेश घोले, माजी सभापती छाया म्हात्रे, संतोष जाधव, जयंत चिबडे, फझल हलदे, अरुणा नाक्ती, गटविकास अधिकारी वाय. एम. प्रभे, पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, महसूल तहसीलदार विजय पाटील, सर्व विभागाचे प्रमुख आदि मान्यवर उपस्थित होते.

सभेचे प्रास्ताविक समितीचे सचिव तथा तहसीलदार समीर घारे यांनी करताना तालुक्यातील सर्व अधिकाऱ्यांमध्ये समन्वय राखणे हे अत्यंत महत्वाचे असून अधिकाऱ्यांनी प्रत्येक योजनेची दखल गांभीर्याने घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. समितीचे अध्यक्ष नाजीम हसवारे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील नगरपंचायत विभागाचा आढावा घेऊन कामात सुधारणा करण्याचे आवाहन केले.त्याच्याबरोबर तालुक्यातील वीज, एम. एम. आर. डी., आरोग्य, वनविभाग, बांधकाम, पाणीपुरवठा, भूमिअभिलेख, शिक्षण, कृषी, फलोद्यान, सामाजिक वनिकरण, स्टेट बँक, बँक ऑफ इंडिया, तहसील इत्यादी विभागाचा आढावा घेऊन सर्व विभागाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी पावसाळ्यापूर्वी सर्व प्रलंबित कामे पूर्ण करण्याच्या सक्त सूचना दिल्या. त्यांनी सांगितले कि खास. सुनिल तटकरे, पालक मंत्री आदिती तटकरे, आम. अनिकेत तटकरे यांच्या प्रयत्नातून तालुक्याच्या आणि शहराच्या विकासासाठी करोडो रुपयांचा निधी प्राप्त होतो. त्याचा योग्य विनियोग होणे आणि प्रत्येक काम हे दर्जेदार होणे महत्वाचे असून हे कर्तव्य प्रत्येक अधिकाऱ्याने प्रामाणिक पणे पार पाडले ...//२

आनंदाचा स्वप्नवत थरार

स्वप्न प्रत्यक्षात येणे काय असते, याचा अनुभव सध्या भारतीय बॅडमिंटन संघ घेत आहे. भारतीय संघ कधी 'थॉमस कप' जिंकू शकेल, याची खात्री कोणासही वाटत नव्हती; मात्र लक्ष्य सेन, किदाम्बी श्रीकांत, एच. एस. प्रणॉय, सात्त्विकसाईराज रांकीरेड्डी, चिराग शेट्टी यांनी जे अशक्य वाटत होते, ते शक्य करून दाखवले. सन १९८३च्या क्रिकेट वर्ल्ड कप विजेतेपदापेक्षाही हे यश जास्त अनपेक्षित, थरारक आहे. बॅडमिंटनमधील जागतिक सांघिक विजेतेपदाची ही 'थॉमस कप' स्पर्धा सुरू झाली, त्या वेळीही भारत या स्पर्धेत विजेता होईल, असे संघातील खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक आणि राष्ट्रीय मुख्य प्रशिक्षक पुलेला गोपीचंद सोडून कोणाला वाटत होते का, हा प्रश्नच आहे. चौदा वेळा विजेत्या राहिलेल्या इंडोनेशियाविरुद्ध पहिली एकेरीची लढत खेळणार असलेल्या लक्ष्यला स्पर्धेत विजय गुंगारा देत होते. सात्त्विक-चिराग हे महंमद एहसान-केविन संजया सुकामुल्जो यांच्याविरुद्ध बहुतेक वेळा पराभूत झाले होते. या वेळी मात्र भारतीयांनी कोणतेही दडपण न घेता खेळ केला आणि विजेतेपद जिंकून दिले. खरे तर भारत हे विजेतेपद जिंकू शकतो, ही शक्यता वर्तवल्यावर चीन, मलेशिया, इंडोनेशियात हास्याच्या उकळ्या फुटत असत; पण भारताने जिंकल्यावर इंडोनेशिया आणि मलेशियाच्या संघास मायदेशात परत कसे जाणार, हा प्रश्न पडला असेल. भारतीय संघाच्या विजयवीरांचे जल्लोषात स्वागत होईल. ते स्पर्धेसाठी गेले, त्या वेळी कोणी त्यांची फारशी दखलही घेतली नव्हती. खेळाडू एकमेकांना प्रोत्साहित करीत होते. एकमेकांना भक्कम साथ देत होते. आपल्या संघातील सर्वांत अनुभवी खेळाडू श्रीकांतचे बोल कानात साठवत होते. श्रीकांत फार काही बोलत नसे. त्याने खूपच साधे सोपे सांगितले होते. आपल्या प्रत्येकाला रोज दिवसातील एक तास खेळायचे आहे. या एका तासात सर्व काही द्यायचे आहे. आपली ही सूचना खेळाडूंनी अमलात आणली, याचा आनंद श्रीकांतला 'थॉमस कप' जिंकल्याचा जल्लोष करताना जास्त होता. भारतीय खूपच कमी स्पर्धांत जागतिक अथवा ऑलिम्पिक विजेते झाले, त्यातही सांघिक खेळ कमी. क्रिकेट, हॉकी सोडल्यास भारतास सांघिक खेळांत फारसे यश नाही. टेनिस या वैयक्तिक खेळाच्या सांघिक स्पर्धेत भारतीयांनी 'डेव्हिस कप' स्पर्धेत चांगली कामगिरी केली आहे; किंबहुना वैयक्तिकपेक्षा सांघिक यश त्यात जास्त आहे. गेल्या वर्षी बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये संयुक्त विजेतेपद जिंकून, आपण वैयक्तिक स्पर्धेतील जागतिक यश मिळवले होते. बॅडमिंटन हा वैयक्तिक खेळ. भारताने त्यात प्रकाश नाथ, नंदू नाटेकर, प्रकाश पदुकोण, पुलेला गोपीचंद, साईना नेहवाल, पी. व्ही. सिंधू, किदाम्बी श्रीकांत असे एकाहून एक सरस खेळाडू निर्माण केले; पण सांघिक विजेतेपद त्यानंतरही आपल्या आवाक्याबाहेरचे वाटत होते. साईना (२०१२च्या ऑलिम्पिक स्पर्धेत ब्रॉंझ), सिंधू (२०१३च्या जागतिक स्पर्धेत ब्रॉंझ) आणि ज्वाला गुत्ता-अश्विनी पोनप्पा (२०११च्या जागतिक स्पर्धेत ब्रॉंझ) हे काहीसे लागोपाठच्या स्पर्धेतील वैयक्तिक यश असूनही, भारतीय महिला संघ काही 'उबेर कप' स्पर्धेत प्रभाव पाडू शकला नाही. त्या क्वचितच एकमेकांना साथ देत होत्या. त्या एका स्पर्धेत एकमेकींसह खेळण्यास तयारही नसत. नेमकी ही उणीव भारतीय पुरुष संघाने दूर केली. त्यांनी एकमेकांना साथ दिली. जागतिक उपविजेता असलेल्या श्रीकांतने कधीही आपल्याला दुसरी एकेरीची लढत खेळायला लागत असल्याची तक्रार केली नाही. त्याने ही महत्त्वाची लढत असल्याचे समजून आव्हान यशस्वीपणे पेलले. भारतीय खेळाडूंनी ही स्पर्धा भारतीय पुरुष बॅडमिंटनला चांगली ओळख देऊ शकेल, असे दाखवणारी एक संधी मानली. जागतिक क्रमवारीत अव्वल झाल्यावरही आपल्यामागे पुरस्कर्ते आले नाहीत, हे श्रीकांतने अनुभवले होते. भारतात स्टार होण्यासाठी, पुरस्कर्त्यांना आकर्षित करण्यासाठी मोठ्या स्पर्धेतील विजेतेपदच लागते, हे त्याच्याव्यतिरिक्त कोण जाणत असणार. टोकियो ऑलिम्पिकची पात्रता साध्य करणे भारतीय पुरुष बॅडमिंटनपटूंना अवघड झाले होते. त्यासाठी करावा लागलेला संघर्ष त्यांना आठवत होता. दुहेरीत प्रगती करणारे चिराग-सात्त्विक यांना प्रशिक्षक मथायस बोए यांचे महत्त्व माहिती होते. त्यांनी त्यांचा सल्ला कायम घेतला. बोए प्रशिक्षक नाहीत, याविषयी गळे काढण्यापेक्षा, त्यांनी त्यातून काय मार्ग काढता येईल, याकडे लक्ष दिले. निर्णायक लढतीत श्रीकांतने स्मॅश मारून मॅच पॉइंटसाठी पाया भक्कम केला आणि विजेतेपद निश्चित करण्याची संधी सोडली नाही. हेच भारतीय बॅडमिंटनपटू भविष्यात करणार आहेत. आम्ही सर्व आव्हान परतवण्यास तयार आहोत. त्यासाठी आक्रमण करण्यासही मागे पाहणार नाही, यशासाठी आमची तयारी आहे, हेच भारतीय पुरुष बॅडमिंटनपटूंनी दाखवले आहे. स्वप्न प्रत्यक्षात येत नसते, ते आणावे लागते, हेच खरे आहे.

वांगणी येथे भव्य जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेचे आयोजन

दै.रायगड नगरी । नागोठणे

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व संकल्प मित्र मंडळ वांगणी (ता.रोहा) यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य अशा जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेचे आयोजन शनिवार दि.२१ मे २०२१ रोजी रात्री ९ वाजता करण्यात आल्याची माहिती या स्पर्धेचे आयोजक, वांगणीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य एकनाथ ठाकूर यांनी दिली. या जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेत समूह तसेच वैयक्तिक नृत्याची जुगलबंदी पहावयास मिळणार आहे. या स्पर्धेमध्ये प्रथम येणाऱ्या ३५ स्पर्धकांस प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच स्पर्धकाने गाण्याची सि.डी व मेकपचे सामान स्वतः सोबत आणायचे आहे. समूह नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक ५००१/- व आकर्षक चषक, द्वितीय क्रमांक ३००१/- व चषक, तर तृतीय क्रमांक ११११/- व चषक देण्यात येणार आहेत. तर वैयक्तिक नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक २२२२/- व आकर्षक चषक, द्वितीय क्रमांक १५५५/- व चषक, तसेच तृतीय क्रमांक ११११/- व चषक देऊन गौरविण्यात येणार आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

पनवेलमध्ये पत्रकार परिषद घ्यावी लागते : बबन पाटील

उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पत्नीचे बंगले असल्याचा आरोपही भाजपने केला. त्याठिकाणी अनेकदा किरीट सोमय्या हे जाऊन देखील आले. परंतु तिथे एकही बंगला दिसून आला नाही. त्यामुळे भाजप नेते हे महाविकासआघाडी सरकार वर वाटेल ते खोटे आरोप करतात हे दिसून येते. कारण १०५ आमदार असतानाही भाजपला सत्तेवर बसता आले नाही त्याचेच पोटशूळ भाजपच्या मनात आहे, म्हणून त्यांना शांत झोप लागत नाही, असा टोलाही बबनदादा पाटील यांनी लगावला.

शासकीय इमारतीवरील पत्र्याची, कौलांची दुरवस्था

करणाऱ्या नागरीकांना सहन करावा लागला होता. यावर्षी पावसाचे आगमन हे लवकरच असल्याचा भाकीत हवामान खात्याने व्यक्त केले आहे. त्यामुळे प्रशासनाने काही ठिकाणी नालेसफाईची कामे युद्ध पातळीवर सुरू केली आहे. परंतु शासकीय कामकाज करणाऱ्या आप आपल्या शासकीय कार्यालयातील इमारतीच्या छतावरील पत्र्याची कौलांची दुरुस्तीकडे दुर्लक्ष केल्याचे पहावयास मिळत आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर शहरातील, तालुक्यातील सर्रास शासकीय कार्यालयातील इमारतीच्या छता मधून पावसाचे पाणी झिरपून कार्यालयातील संगणक बंद पडून इंटरनेट सेवा कोलमडून पडल. तसेच महत्त्वाची कागदपत्रे भिजण्याचा धोका निर्माण होऊ शकतो अशी भिंती इमारतीच्या छतावरील दुरवस्थेमधून दिसून येत आहे.

०१ जून ते ३१ जुलै २०२२ या कालावधीत मासेमारी बंद

२०२१ च्या कलम १४ अन्वये नौका व नौकेवर बसविलेली उपसाधने व मासेमारी सामुग्री आणि त्यामध्ये सापडलेली मासळी जप्त करण्यात येईल, तसेच कलम १७ मधील तरतुदीन्वये जास्तीत जास्त दंडात्मक शिक्षा करण्यात येईल. दि.०१ जून २०२२ पूर्वी मासेमारीस गेलेल्या नौकांना दि.०१ जून २०२२ नंतर कोणत्याही परिस्थितीत बंदरात मासे उतरविण्यास परवानगी असणार नाही व अशा नौका महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), २०२१ अंतर्गत कारवाईस पात्र राहतील, असे सूचित करून सर्व मासेमारी नौका दि.३१ मे २०२२ वा तत्पूर्वी बंदरात पोहोचतील, याबाबत संबंधित नौकामालकांनी नोंद घ्यावी. तसेच या आदेशानुसार पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत कोणतीही यांत्रिक मासेमारी नौका कोणत्याही कारणास्तव समुद्रात जाणार नाही, याची संबंधितांनी कटाक्षाने दक्षता घ्यावी आणि अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) श्री.एस.आर भारती यांच्याशी सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय कार्यालय, तिसरा मजला, श्री सिद्धी अपार्टमेंट, डॉ.पुष्पलता शिंदे हॉस्पिटलच्या समोर, अलिबाग-पेण रोड, पिन-४०२२०१. दूरध्वनी क्रमांकः- ०२१४१-२९५२२१ येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) श्री.एस.आर भारती यांनी केले आहे.

बीडीडी चाळीतील पोलीसांना बांधकाम दराने मिळणार घरे : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

हे स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते, बीडीडी चाळीत अनेक वर्षांपासून लोक राहत आहेत. या चाळींचा पुनर्विकास ही एक महत्वाकांक्षी योजना आहे. हे काम पुढे न्यायचे आहे. मात्र, पुनर्विकास करीत असतांना स्थानिकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात यावा. या भागात उपलब्ध असलेल्या इतर घराच्या बाजार भावाच्या किंमतींपेक्षा कमी दराने त्यांना घरे मिळावीत, यासाठी गृहनिर्माण विभागाने विचार करावा असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

बीडीडी चाळीत सुमारे २९०० घरे ही पोलीस सेवा निवासस्थाने आहेत या पैकी ७०० पोलीस निवासस्थाने ही बीडीडी प्रकल्पात असतील तर उर्वरित २२०० घरे ही माहिम, वरळी ते दादर या परिसरात पोलीस सेवा वसाहतीसाठी दिले जातील, अशी माहिती मंत्री डॉ. आव्हाड यांनी यावेळी दिली. बी.डी.डी. चाळीतील पोलीस सेवा निवासस्थानात १ जानेवारी २०११ पूर्वी राहत असणाऱ्या सेवानिवृत्त, मयत किंवा सेवेत असणाऱ्या पोलीसांना बांधकाम दराने घरे मिळवित यासाठी प्रयत्न सुरु होते. या परिसरात किमान एक ते दिड कोटी रुपये एवढा दर असतांना विशेष बाब म्हणून सुमारे ५० लाख रुपयांना ही घरे त्यांना मिळावीत यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. याबाबतचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री घेतील असेही डॉ. आव्हाड यांनी सांगितले.

जंगल संपत्तीच्या ऱ्हासामुळे रानमेवा होऊ लागला दुर्मिळ

होऊ लागली. त्याचे परिणाम जंगल संपत्तीवर होऊ लागतर आहेत. जंगलाच्या आश्रयाला असलेले व प्रत्यक्ष जंगलात राहणाऱ्या बहूतांश लोकांचा उदरनिर्वाह हा जंगलावरच अवलंबून असल्याने जंगल संपत्तीच्या ऱ्हासाचे परिणाम त्यांनाही भोगावे लागत आहेत. ऊन्हाळ्यात जंगल भागात तयार होणारे आंबे, काजू, फणस, करवंदे, जांभळे, फणस आदी रानमेवा मिळविण्यासाठी सद्य स्थितीत फार मोठी धडपड करावी लागत असल्याचे आदिवासी भगिनींकडून सांगण्यात येत आहे. तर सततची होणारी वृक्षतोड व जंगलात लावले जाणारे वणवे यांचाही परिणाम रानमेव्यावर होऊ लागल्याने पूर्वी पेक्षा रानमेवा मिळण्याचे प्रमाणही कमी झाले असून ते मिळविण्यासाठीच फार मोठी धडपड करावी लागत असल्याचे सांगण्यात आले आहे.

रोहा आगार प्रमुख ग्रामीण भागातील प्रवाशांकडे लक्ष देतील काय?

तर ऑनलाइन करा असे सांगितले जाते. परंतु डोंगराळ भागात रेंज नसते हे त्यांना माहीत असूनही प्रवाशांना उडवाउडवीची उत्तरे देतात.तसेच सर्वांकडे एनरोड मोबाईल असतोच असे नाही त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. हे असे किती दिवस चालणार एकतर सुतारवाडी मार्गे पुणेकडे जाणारी आणि पुणे येथून येणारी एकच एस.टी. आहे. ती चुकली तर विळे येथे जावे लागत आहे. खर्चीक वाहनातून विळेपर्यंत जावून तेथून माणगाव कडून येणाऱ्या एस.टी. ची प्रतिक्षा करावी लागत आहे. रोहा आगराने प्रवाशांचे होणारे हाल लक्षात घेवून कोलाड वाहतूक नियंत्रकाद्वारे आरक्षणाची व्यवस्था करावी तसेच जिथून जायचे आणि ज्या ठिकाणी जायचे तेथील आरक्षण द्यावे या गोष्टी लवकर प्रवाशांना घाव्यात. अन्यतः स्थानिक आमदार तसेच परिवाहन मंत्र्यांकडे लेखी तक्रार करण्यात येईल असा इशारा स्थानिक प्रवाशांनी केला आहे.

गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचे अध्यक्षांचे निर्देश

पाहिजे. त्यांनी पुढे सांगितले कि तालुका समन्वय आणि पुनर्व्हिलोकन समिती हि अत्यंत महत्वाची असून तालुक्याच्या विकासात्मक दृष्ट्या या समितीला अनन्यसाधारण महत्व आहे.वरिष्ठानी माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यावर सोपविलेली जबाबदारी मला प्रामाणिक पणे सांभाळली पाहिजे त्यासाठी तालुक्यातील सर्व अधीकार्यांनी सहकार्य केल पाहिजे असे सांगून यापुढे प्रभारी चार्ज असणारे अधिकारी वगळता कोणत्याही प्रतिनिधिने उपस्थित राहू नये. आज संपन्न झालेल्या सभेस अनुपस्थित अधिकाऱ्यांवर योग्य कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी याप्रसंगी दिले.

तहसीलदारांच्या लेखी आश्वासनानंतर माजी उपसरपंच संतोष बावधाने याचे आमरण उपोषण स्थगित

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

सुधागड तालुक्यातील पाच्छापूर फाटा ते पाच्छापूर गाव या रस्त्याची तत्काळ दुरुस्ती व्हावी यासाठी गौळमाळ येथील माजी उपसरपंच संतोष बावधाने हे सोमवारी (ता.१६) पाली तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसणार होते. मात्र पाली-सुधागड तहसीलदारांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर बावधाने यांनी आपले उपोषण स्थगित केले आहे. मंगळवारी (ता.१७) संतोष बावधाने यांनी यासंदर्भातील निवेदन तहसीलदारांना दिले आहे.

या निवेदनात संतोष बावधाने यांनी म्हटले आहे की या रस्त्यासंदर्भात योग्य कारवाई करू असे आश्वासित केल्यामुळे मी माझे उपोषण रविवार दिनांक २२ पर्यंत स्थगित केले आहे. मात्र तहसीलदारांनी यासंदर्भात दिलेले आश्वासन पूर्ण न झाल्यास सोमवार (ता.२३) पासून पाली तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसणार आहे. असा इशारा देखील बावधाने यांनी निवेदनात दिला आहे. तर तहसीलदारांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की बावधाने यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने तालुका समन्वय समिती अध्यक्ष, गटविकास अधिकारी व शाखा अभियंता यांच्या सोबत तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी बैठक घेऊन हा रस्ता दुरुस्त करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच संबंधित यंत्रणेशी संपर्क साधून रस्त्यासंदर्भात उपयोजना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. असे पत्रात नमूद केले आहे. या लेखी आश्वासनानंतर संतोष बावधाने यांनी आपले उपोषण स्थगित केले आहे.

सिद्धार्थ विकास संघ गोवे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

सिद्धार्थ विकास संघ गोवे (रजि.)मुंबई यांच्या विद्यमाने तथागत भगवान गौतम बुद्ध,छत्रपती शिवाजी महाराज,व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती शनिवार दि २१ मे २०२२ रोजी गोवे येथे विनोद शांताराम गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली असून या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

यनिमित्ताने सकाळी ९.००वा.बौद्ध उपासक योगेश जाधव पहूर यांच्या सुभेहस्ते ध्वजारोहण व बुद्ध पूजन,सकाळी ११ वा.सांस्कृतिक कार्यक्रम,सायंकाळी ४.०० वा.नविन बौद्धवाडी ते शिवाजी महाराज स्मारकापर्यंत भव्य मिरवणूक,रात्री ७.०० वा. जाहीर सभा रात्री ९.०० वा.हृतिक कांबळे आणि संच मुंबई यांचा ऑर्केस्ट्रा आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात करण्यात येणार असून यानिमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून प्रमोद बाबर पो.नि. रोहा,सुभाष जाधव सहा. पो. नि. कोलाड,विकास शिंदे बौ.पं. स.रोहा तालुका अध्यक्ष,महेंद्र पोटफोडे आदर्श सरपंच गोवे,नरेंद्र जाधव विभागीय अध्यक्ष,नरेश गायकवाड सचिव युवा संघ रायगड,चंद्रकांत वाटवे अध्यक्ष शाखा पडम,सुरेश गायकवाड सर सामाजिक कार्यकर्ते,चंद्रकांत कांबळे,उपाध्यक्ष बौ. पं.स.रोहा,भावना कापसे उपसरपंच रोहा,नितीन जाधव माजी उपसरपंच गोवे,संदिप जाधव सामाजिक कार्यकर्ते,नरेंद्र पवार माजी. सरपंच,प्रविण पवार सामाजिक कार्यकर्ते,शांताराम पवार तंटामुक्ती अध्यक्ष गोवे, सुमित गायकवाड ग्रा.पं. सदस्य, रजनी रमेश गायकवाड माजी ग्रा.पं.सदस्या गोवे हे उपस्थित राहणार आहेत.सर्व कार्यक्रम यशस्विकरण्यासाठी जयंती उत्सव कमेटी अध्यक्ष राजेंद्र गायकवाड, उपाध्यक्ष संजय गायकवाड,चिटणीस संतोष गायकवाड,उपचिटणीस सचिन गायकवाड,खजिनदार निलेश गायकवाड,उपखजिनदार मोहन गायकवाड,हिशोबतपाणीस जितेंद्र गायकवाड संदेश वाहक सुरेश गायकवाड,संदीप गायकवाड तसेच सिद्धार्थ विकास संघ गोवे, मुंबई, महिला मंडळ,तरुण वर्ग मेहनत घेत आहेत.कार्यक्रमाचे प्रास्ताविक समिर गायकवाड तर सूत्रसंचालन राजेंद्र गायकवाड करणार आहेत

जाहीर नोटीस

मी प्रोमिला सुनिल शर्मा, माझे पती सुनिल कुमार शर्मा याचे निधन झाले असून यांच्या नावे असलेली Ertiga Zxi Grey Colour-MH-46-W-3597 ही मी माझ्या नावे ट्रान्सफर करत आहे.

तरी कोणाला या संदर्भात हरकत असल्यास ७ दिवसांच्या आत मो.९३२४३८७७५९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

दि.१९/५/२०२२

सही/-
प्रोमिला सुनिल शर्मा

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, सदरहू मिळकत श्री.अविनाश राजाराम म्हात्रे रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांनी खालील मिळकती साठेकराराद्वारे विकत घेतल्या आहेत. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतींचे वर्णन
मौजे : पुनाडे, ता.उरण, जि.रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार
८	४	०-३८-० पो.ख. ०-८-० एकूण ०-४६-०	०.८६

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

मौजे : पुनाडे, ता.उरण, जि.रायगड येथील सर्व्हे नं. / हिस्सा नं.८/४ क्षेत्र ०-४६-० (हे.आर.पॉ.) एवढी मिळकत आमचे अशिल श्री.अविनाश राजाराम म्हात्रे यांनी साठेकरार करून मुळ मालक श्री.धर्मा हाल्या पाटील, श्री.सहदेव सावळाराम पाटील व द्वारकाबाई नारायण म्हात्रे यांनी खरेदीखताचा पूर्ण मोबदला अदा करून सदरहू मिळकतीचा ताबेकब्जा, वहिवाट आमचे अशिलांना मुळ मालक यांनी दिला असून आजपर्यंत सदरच्या मिळकती आमचे अशिलांच्या वहिवाटीस व शांततामय, ताबेकब्जास अखंडीत आहे. मात्र मुळ मालक यांच्या चाल-ढकल व वेळकाढू पणामुळे सदरहू मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत आमचे अशिलांची करण्याची इच्छा व तयारी असताना मुळ मालक श्री.धर्मा हाल्या पाटील, श्री.सहदेव सावळाराम पाटील व द्वारकाबाई नारायण म्हात्रे यांच्या वेळकाढुपणामुळे व त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस यांनी वेळकाढूपणा केल्यामुळे खरेदीखत नोंदणीकृत करण्याचे राहून गेले आहे. आजतागायत देखील सदरहू मिळकतीवर आमच्या अशिलांचा ताबेकब्जा व वहिवाट आहे.

तरी सदरहू मिळकतीचे संदर्भात कोणीही वरील मिळकतीमध्ये कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाणखत, खरेदीखत, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. व तत्सम दस्त केल्यास ते दस्त आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

सही/-
ॲड.सुमित अविनाश म्हात्रे
जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४,
गावदेवी मंदिरासमोर, राम गणेश गडकरी
मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.९८९२१३२६७३

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, दि.२५ ऑक्टोबर २०२० रोजी बनविण्यात आलेली ''गौतम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स'' ही पार्टनरशिप फर्म होती व त्यामध्ये श्री.विकास गौतम डिंग्रे तसेच श्री.निलेश सुधाकर बनसोडे व श्री.बिपीन दत्ताराम शिंदे असे पार्टनर्स होते व त्यांचे ऑफिस बिल्डींग नं.सी-५-०१-०४, तळमजला, सेक्टर-१८, सुर्या हॉटेल जवळ, नवीन पनवेल येथे होते.

दि.११ मे २०२२ रोजी सदरच्या भागीदारीचे विघटन होवून श्री.विकास गौतम डिंग्रे हे सदरच्या भागीदारी मधून बाहेर पडत आहेत. व त्यासाठी इतर दोन भागीदारांची कोणतीही हरकत नाही. श्री.विकास गौतम डिंग्रे यांनी कायदेशीररित्या सदरच्या भागीदारी मधून बाहेर पडत आहेत, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १८/०५/२०२२
ठिकाण : पनवेल

सही/-
श्री.विकास गौतम डिंग्रे
मो.नं.८९७६१००१०१

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल मेसर्स.ज्युपीटर कन्स्ट्रक्शनस्तर्फे प्रोपरायटर श्री.अर्जुन अशोक ताराचंदनी पत्ता : ऑफिस नं.४०२, ४०३, एन.एम.एस., आयकॉन, प्लॉट-१९४, सेक्टर १९, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड, हे श्री.जैनुलआबेदुन बिसमिल्लाह खान यांच्या मालकीचे व ताबेकब्जातील मौजे : द्रोणागिरी येथील खालील वर्णनाचे भूखंड विकसित करण्याबाबतचा करार काही रक्कम देवून केलेला आहे.

भूखंडाचे वर्णन

नोड	सेक्टर	भूखंड क्रं.	क्षेत्र चौ.मी.	सिडको संचिका क्रं.
द्रोणागिरी	५४	२९ ए	४९९.९३ चौ.मीटर	द्रोणागिरी-७६६

वर नमूद केलेले भूखंडाचे मालक श्री.जैनुलआबेदुन बिसमिल्लाह खान यांच्याकडून आमचे अशिलांनी सदरहू भूखंडाबाबत विकसनाचा करारान्वये सदरचे भूखंड (५०%-५०%) तत्वावर विकसित करण्याचा विचार केलेला आहे. तरी सदरहू मिळकतीवर, मिळकतीबाबत मिळणाऱ्या भूखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीस वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकरचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्रीचा / विकसनाच्या कराराचे व्यवहार पूर्ण करतील व त्यांनतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१९/०५/२०२२

सही/-
एन.ए.शेख आणि असोसिएटस
वकील व नोटरी
जी/५ आणि सी/२०, अमन सोसायटी,
सेक्टर ५ ई, कळंबोली, नवी मुंबई
मो.नं.९९२०९९६९०९

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल मेसर्स.ज्युपीटर कन्स्ट्रक्शनस्तर्फे प्रोपरायटर श्री.अर्जुन अशोक ताराचंदनी पत्ता : ऑफिस नं.४०२, ४०३, एन.एम.एस., आयकॉन, प्लॉट-१९४, सेक्टर १९, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड, हे श्री.जैनुलआबेदुन बिसमिल्लाह खान यांच्या मालकीचे व ताबेकब्जातील मौजे : द्रोणागिरी येथील खालील वर्णनाचे भूखंड विकसित करण्याबाबतचा करार काही रक्कम देवून केलेला आहे.

भूखंडाचे वर्णन

नोड	सेक्टर	भूखंड क्रं.	क्षेत्र चौ.मी.	सिडको संचिका क्रं.
द्रोणागिरी	५४	२९ ए	४९९.९३ चौ.मीटर	द्रोणागिरी-७६६

वर नमूद केलेले भूखंडाचे मालक श्री.जैनुलआबेदुन बिसमिल्लाह खान यांच्याकडून आमचे अशिलांनी सदरहू भूखंडाबाबत विकसनाचा करारान्वये सदरचे भूखंड (५०%-५०%) तत्वावर विकसित करण्याचा विचार केलेला आहे. तरी सदरहू मिळकतीवर, मिळकतीबाबत मिळणाऱ्या भूखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीस वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकरचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्रीचा / विकसनाच्या कराराचे व्यवहार पूर्ण करतील व त्यांनतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१९/०५/२०२२

सही/-
एन.ए.शेख आणि असोसिएटस
वकील व नोटरी
जी/५ आणि सी/२०, अमन सोसायटी,
सेक्टर ५ ई, कळंबोली, नवी मुंबई
मो.नं.९९२०९९६९०९

मा.सोनवणे साहेब

प्रो.जमा.६-२५

अर्जदाराचे वकील
ॲड.विजय गडगे
ॲड.सागर गोंधळी

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.६१८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०६/२०२२

१) श्री.विनायक वामन भगत
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : शेती
२) सौ.मिनाक्षी प्रवीण पाटील
पुर्वाश्रमीचे नाव कुमारी मिनाक्षी वामन भगत
वय : ३३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.वामन धर्मा भगत
वय : ६४ वर्षे, व्यवसाय : शेती
अर्जदार क्रं.१ ते ३ रा.उसर्ली, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

ज्याअर्थी कै.कलावती वामन भगत ही दि.१९/०६/२०२१ रोजी मौजे : उसार्ली, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांचे राहत्या घरी मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड

अ.क्र.	यु.केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)
१	कामोठे ३२३	२८४	१२	०-१५-९
२		२९८	६	०-१६-२
३		२४८	१३	०-१५-०
४		२५६	२	०-१२-१
५		२५७	१	०-११-३
६		२५७	९	०-०-०८

संक्षिप्त...

वाणदे येथे सायकलींचे वाटप

दै.रायगड नगरी । कोर्लई

मुरूड तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा नऊगांव आगरी समाजाचे अध्यक्ष तुकाराम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्यातर्फे वाणदे, शिघ्रे, नवीवाडी, आदिवासीवाडी, नागशेत जोसरांजण, उंडरगांव, आंबोली बौद्धवाडी येथील गरिब गरजू मुलींना आयोजित कार्यक्रमात सायकल वाटप करण्यात आले. रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या सौ.नम्रता कासार,वावडुंगी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अजित कासार, पुरोगामी युवक संघटनेचे उपाध्यक्ष राईल कडू, पंचायत समितीचे माजी सभापती किशोर धामणस्कर, भरत महादान, राजेश करजेकर, अशोक नाक्ती, अमोल पाटील, श्रीकांत वारगे, स्वाती वारगे, प्रदीप दिवेकर, प्रकाश भायदे, सखाराम गायकर, अमित गायकर, राजेश दिवेकर, गणेश नाक्ती, कलावती पाटील, पप्पू कासार, रामचंद्र पाटील, पालक, विद्यार्थी विद्यार्थीनी व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.यावेळी. नऊगांव आगरी समाज अध्यक्ष,खार आंबोली विविध कार्यकारी सहकारी सोसायटी चेअरमन तथा मुरुड स्वप्नपूर्ती कंपनी संचालक, पंचक्रोशी आगरी समाज सल्लागार तुकाराम पाटील यांचे वाढदिवसानिमित्ताने अभिष्टचिंतन करण्यात आले. वाढदिवसाचे औचित्य साधून चित्रलेखा पाटील यांच्यातर्फे गरिब गरजू मुलींना सायकल वाटप करण्यात आले.यावेळी अजित कासार, तुकाराम पाटील, रामचंद्र पाटील, अनंता ठाकूर, किशोर धामणस्कर, घनश्याम श्रीवर्धनकर आदी. नी आपले विचार मांडले. शेतकरी कामगार पक्षाचे आमदार जयंत पाटील, माजी आमदार पंडितशेठ पाटील, आस्वाद पाटील, चित्रलेखा पाटील यांनी माझ्या गावात, परीसरात व तालुक्यात अनेक विविध विकास कामे केली.

आर्थिक सक्षमीकरणासाठी महिलांनी नवतंत्रज्ञानासह कृषिपूरक व्यवसायाची कास धरावी : ज्योती ठाकरे

दै.रायगड नगरी । दापोली

आर्थिक सक्षमीकरणासाठी महिलांनी पारंपरिक शेतीऐवजी कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या नवतंत्रज्ञानासह कृषिपूरक व्यवसायाची कास धरावी, असे प्रतिपादन महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षा ज्योती ठाकरे यांनी येथे केले.सुवर्ण पालवी कृषी महोत्सवात आयोजित केलेल्या महिला शेतकरी मेळाव्यात प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ . संजय सावत होते .

व्यासपीठावर विशेष अतिथी म्हणून द्राक्ष संशोधन केंद्र, पुणेच्या माजी संचालिका डॉ. इंदू सावंत व दापोलीच्या नगराध्यक्षा ममता मोरे तर अतिथी म्हणून बौद्धिक संपदा सल्लागार अधिवक्ता समीक्षा दाभाडे व प्रगतशील हळद उत्पादक शेतकरी श्रेया कदम उपस्थित होत्या. ज्योती ठाकरे पुढे बोलताना म्हणाल्या की , कोणत्याही योजनेचा लाभ महिला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्यास ती योजना नक्कीच यशस्वी होते,असा अनुभव असल्याने शेतकऱ्याच्या सात – बारावर पतीसोबत पत्नीचेही नाव नमूद करण्याचे आदेश महाराष्ट्र शासनाने द्यायला हवेत. असे झाल्यास विविध शासकीय योजनांचा लाभ महिला शेतकऱ्यांना घेता येईल व शासनाचेही उद्दिष्ट सफल होईल. ग्रेन बँक, ग्रीन बँक व गोट बँकेची गरज प्रतिपादन करीत या ' थ्री जी ' योजनेमुळे पालघर जिल्ह्यात सकारात्मक बदल घडून आल्याची यशकथा त्यांनी विदित केली. समुद्रातील शेवाळ लागवडीचा व्यवसाय फायदेशीर असून ४५ दिवसांत वाढणारे शेवाळ आयस्क्रीम व कॉस्मेटिकमध्ये वापरल्या जातात, त्यामुळे मत्स्य उत्पादकांसाठी हा अत्यंत फायदेशीर पूरक व्यवसाय असल्याचे त्या म्हणाल्या. महिला आर्थिक विकास महामंडळाने रुपये ६०/– प्रती वर्ष याप्रमाणे विमा पॉलिसी तयार करून स्त्रियांच्या जीवनाची हमी घेण्याचा प्रयत्न केल्याचे अभिमानाने नमूद केले. कोकण कृषी विद्यापीठाने मागील पाच दशकात केलेल्या शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यामुळे कोकणचा कायापालट झाला असून शेतकऱ्यांचा नक्कीच फायदा झाला आहे. हे विद्यापीठ एक लखलखणारा दिवा असून शेतकरी, शास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्था, बचत गट इत्यादींच्या समन्वयातून प्रामाणिक प्रयत्न केल्यास कृषि क्रांती घडू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. संजय सावंत म्हणाले की, कोकणातील शेती व्यवसायिक करण्याची गरज असून महिलांनी एकत्र आल्यास ते शक्य आहे. लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यात अत्यल्प पाऊस पडूनही तेथील शेतकरी अत्यंत नियोजनबद्धरीत्या पिकांच्या जातीची, संसाधनाची निवड करून शेती फुलवतात त्यांच्याकडील धैर्य कोकणातील शेतकऱ्यांनी आत्मसात केल्यास कायापालट होण्यास वेळ लागणार नाही. तज्ज्ञांच्या माध्यमातून उद्योजकता विकास व नेतृत्व विकसित केल्यास निश्चितच सकारात्मक बदल घडून येईल, असा विश्वास व्यक्त करीत हा मेळावा म्हणजे त्याची सुरुवात आहे, असे समजून या, असे प्रतिपादन त्यांनी केले.

डॉ. इंदू सावंत म्हणाल्या की, प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे पर्यावरणाची हानी होत असल्याने कोकणात येणाऱ्या पर्यटकांच्या प्लास्टिक वा–परावर निर्बंध असायला हवे, वापरणाऱ्यावर दंड आकारायला हवा शिवाय त्यांच्यात जागरूकता निर्माण करायला हवी. कोकण विकासासाठी कृषि आणि पर्यटन याकडे अधिकाधिक लक्ष देण्याची गरज आहे. पिझ्झा, बर्गर, मंच्युरियन अशा पदार्थांऐवजी स्थानिक पातळीवर उपलब्ध पदार्थांचा आहारात जाणून समावेश करायला हवा. समुद्रातील माशांच्या प्रजनन काळात मासेमारीवर निर्बंध आणण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी उद्यान विद्या विभागाचे प्राध्यापक डॉ. सी. डी. पवार यांनी महिला सक्षमीकरणासाठी फळप्रक्रिया , के.एम. डी रिइन्शुरन्स ब्रोकर्स प्रा. लि. मुंबईचे सरव्यवस्थापक मोहन पटे यांनी विमा संरक्षण, अधिवक्ता समीक्षा दाभाडे यांनी बौद्धिक हक्क संपदा व हळद उत्पादक प्रगतशील शेतकरी श्रेया कदम यांनी हळद उत्पादनाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात डॉ. संजय भावे म्हणाले की, नवतंत्रज्ञानामुळे कोकणातील शेती कात टाकत असून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावत आहे. शिक्षण आणि शेती यावर जग अवलंबून असून शेतीतून समृद्धी आणण्यासाठी कृषि साक्षरता गरजेची आहे. स्त्रियांच्या सहभागानेच कृषी क्रांती घडू शकते, असे नमूद करीत कृषि प्रदर्शन व शेतकरी मेळाव्यातून संशोधनाची दिशा ठरविण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावरील मान्यवरांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला आर. व्ही. बेलोसे एज्युकेशन फाउंडेशन दापोलीच्या अध्यक्षाजानकी बेलोसे, जिल्हा परिषदेच्या रत्नागिरीच्या माजी अध्यक्षा रोहिणी दळवी, जि. प.च्या माजी समाज कल्याण सभापती चारुता कामतेकर,नगरसेविका अनु. शिवानी खानविलकर,कीर्ती परांजपे, कृपा घाग,लाल बहादूर शास्त्री सोशल फोरम ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ रवींद्र मर्दाने, पितांबरी उद्योग समूहाचे मुख्य परिचालन अधिकारी मधुकर पुजारी प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष वरवडेकर यांनी केले. तर आभार डॉ. प्रवीण झगडे यांनी मानले. कार्यक्रमाला महिला शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

नावडे उड्डाणपुलामुळे नावडे गाव, नावडे कॉलनी वासियांची अपघातापासून मुक्तता

दै.रायगड नगरी । पनवेल

कळंबोली शिळफाटा मार्गावर नावडे फाटा येथील वाहतुकीची समस्या नवीन नाही. जवळपास दोन दशकांपासून येथील रहिवासी अपघात, वाहतुक समस्येला तोंड देत आले आहेत. शासनाच्या लालफितीत अडकलेल्या या उड्डाणपुलाचे काम पूर्ण होऊन उदघाटन होत नसल्याने भाजप आणि शेकापने वेगवेगळे उदघाटन करून हा पूल कार्यान्वित केला आहे. यामुळे नावडे फाट्या येथील वाहतुकीची समस्या कायमस्वरूपी मार्गी लागली आहे.

नावडे गाव, नावडे कॉलनी आणि तळोजा एमआयडीसी कडे जाणे सोपे झाले आहे. यापुर्वी नावडे फाट्यावर अर्धा तास, एक तास वाहतुक कोंडी नेहमीच होत असे. विशेष म्हणजे या मार्गावरील शाळा, गाव, आणि वसाहती मधील लोकांना याचा सर्वात जास्त त्रास सहन करावा लागत असे. अनेकवेळा याठिकाणी झालेल्या अपघातात निष्पापांना आपला प्राण गमवावा लागला आहे.या सर्वांतून येथील रहिवाशांची मुक्तता झाली आहे. तीन वर्षांपासून काम सुरू असलेल्या पनवेल मुंब्रा महामार्गांवरील नावडे गावाजवळच्या उड्डाणपुलाचे काम महिनाभरापुर्वी पुर्ण झाले आहे. तळोजा एमआयडीसी मध्ये जाणाऱ्या मोठ्या प्रमाणात अवघड वाहनांची प्रचंड येजा याठिकाणी असल्याने दररोजची वाहतुक कोंडी हि येथील मुख्य समस्या बनली होती. तळोजा एमआयडीसीतील अवजड वाहनांमुळे वारंवार वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणाऱ्या नावडे गाव आणि नावडे कॉलनीतील रहिवाशांना या पुलामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. उड्डाणपुलाचे काम पूर्ण होऊन महिना भराचा काळावधी लोटुन देखील उडडाणपूल कार्यान्वित होत नसल्याने भाजप युवा मोर्चाचे दिनेश खानावकर आणि शेकापचे नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी वेग–वेगळे कार्यक्रम आयोजित करून हे उड्डाणपूल वाहतुकीस सुरु केले. या उडडाणपुलाच्या उदघाटनात राजकारण झाले असले तरी सर्वसामान्यांच्या दृष्टीने हे राजकारण सोयीचे असल्याने सर्वसामान्यांनी याचे स्वागत केले आहे. तळोजा वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी देखील नावडे फाटा येथील उड्डाणपूल कार्यान्वित झाल्याने अपघात कमी होणार असुन नावडे फाटा येथील रहिवाशांची वाहतुक कोंडीतुन मुक्तता होणार असल्याचे सांगितले. नावडे फाटा येथील उडडाणपुलाची वाहतूक कोंडीतुन मुक्तता झाली आहे.मात्र अतिवेगाने उडडाणपूल पार केल्यावर उडडाणपूल उतरलेल्या वाहन चालकांच्या वेगळा रोडपाली फाटा येथे ब्रेक लागत आहे.रोडपाली फाट्याजवळ मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत असून या जंक्शनला वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने विकसित करण्याची गरज निर्माण झाली आहे.

कर्नाळा अभयारण्यातील पक्षी, प्राण्यांची गणनेला सुरुवात ; कोविड कालानंतर प्रथमच गणना

दै.रायगड नगरी । पनवेल

वन्यजीव विभागामार्फत प्राणी आणि पक्षांची गणना होत असते. कर्नाळा अभयारण्यात देखील एका संस्थेच्या मदतीने या पक्षी आणि प्राण्यांच्या गणनेला सुरुवात केली गेली.

नवी मुंबई, पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात सिमेंटचे जंगल उभे राहत आहे, त्यामुळे पनवेलपासून अवघ्या काही कि.मी. अंतरावर असलेल्या कर्नाळा अभयारण्याला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. मोठ्या प्रमाणात पर्यटक या ठिकाणी भेट देत असतात.

लाखो पर्यटक दरवर्षी या अभयारण्याला भेट देत असतात. सुमारे १२.१५५ चौरस किलोमीटरच्या परिसरात हे अभयारण्य वसले आहे. स्थानिक तसेच स्थलांतरित १४७ प्रजातीचे पक्षी या ठिकाणी आहेत. यामध्ये ३७ प्रकारचे पक्षी हे स्थलांतरित पक्षी आहेत. विविध प्रकारच्या हिंस्र प्राण्यांचाही या ठिकाणी अधिवास आहे. या प्राण्यांच्या सध्याची स्थिती माहिती करण्यासाठी वन्यजीव विभागामार्फ. विविध महत्वाच्या ठिकाणी यंत्रणा कार्यान्वित केली आहे.

सध्याची वातावरणातील परिस्थिती तसेच वाढता उकाडा पाहता, पाणथळ्या शेजारी वनविभागाने निवडलेले कर्मचारी या भागावर लक्ष ठेवून असणार आहेत.काही ठिकाणी ट्रॅक कॅमे–यांची देखील याकरिता मदत घेतली जाणार आहे.

एका संस्थेचे स्वयंसेवक व कर्नाळा अभयारण्यातील वनविभागाचे कर्मचारी या गणनेसाठी २४ तास प्राणी आणि पक्षांवर लक्ष ठेवून राहणार असल्याची माहिती कर्नाळा अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी नारायण राठोड यांनी दिली.

मागील दोन वर्षापासून सुरु असलेल्या कोविडच्या प्रादुर्भावामुळे बुद्धपौर्णिमेला प्राण्यांची गणना होऊ शकली नव्हती मात्र कोविडचा प्रादुर्भाव कमी झाल्याने यावर्षी वनविभागाने गणनेचे काम हाती घेतले आहे.

मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सहदिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.७७६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०६/२०२२

१) श्री.जनार्दन दत्तू उर्फ दत्तात्रेय कटेकर, वय : ६७ वर्षे
रा.भंगारपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.शारदा रामदास गायकवाड, वय : ५३ वर्षे
रा.ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड
३) कै.पार्वती लहू पाटील (मयत) वारसदार :
३/१) प्रभावती लहू पाटील, वय : ४४ वर्षे
रा.दापोली, पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड
३/२) सरिता लहू पाटील, वय : ५५ वर्षे
रा.दापोली, पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.दत्तु अंबाजी कटेकर हे दि.२६/०४/२०१६ रोजी मौजे : भंगारपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांची पत्नी नर्मदा दत्तू कटेकर या दि.२८/०८/२०२० रोजी मयत झाल्या आहेत व त्यांची मुलगी पार्वती लहू पाटील या दि.१७/०८/१९८८ रोजी मयत झाली आहे. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

मिळकतींचे वर्णन

युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हि.नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.
दापोली–१४	१२९	७	०–१५–०

सदर मिळकतीचे नुकसान भरपाईपोटी खालील वर्णनाचा भूखंड वाटप झालेला आहे.

भूखंडाचे वर्णन

स्थळ	सेक्टर क्रं.	भूखंड क्रं.	क्षेत्र चौ.मीटर
पुष्पकनगर–दापोली	३	१८९	२४०

अर्जदार हे कै.दत्तु अंबाजी कटेकर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१८/०५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सहदिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.७४८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०६/२०२२

१) सौ.सुनिता उदय कोळी, वय : ४२ वर्षे
रा.नवपाडा, करंजा, ता.उरण, जि.रायगड
२) सौ.रसिका उर्फ कविता सुभाष कोळी, वय : ३८ वर्षे
रा.रोडे, ता.पेण, जि.रायगड
३) सौ.सविता दिपक डोलकर, वय : ३७ वर्षे
रा.गणेशपुरी, पो.उलवा, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.निकिता अशोक कोळी, वय : ३३ वर्षे
रा.मोहा, पो.उलवा, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.निलम विनायक कोळी, वय : २८ वर्षे
रा.गणेशपुरी, पो.उलवा, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.बेबीबाई रामनाथ कोळी उर्फ वैती या दि.२७/११/२०१९ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, ता.पनवेल येथे मयत झाल्या आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

मिळकतींचे वर्णन

युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हि.नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.
ओवळे–२९६	११५	५	०–०८–३
	११६	८	०–२३–५
	१२९	१०	०–०३–०

सदर मिळकतींचे संपादनाच्या मोबदल्यात खालील वर्णनाचा भूखंड वाटप झालेला आहे.

भूखंडाचे वर्णन

स्थळ	सेक्टर क्रं.	भूखंड क्रं.	क्षेत्र चौ.मीटर
पुष्पकनगर–दापोली	८	१३४ ए	५५०

अर्जदार हे कै.बेबीबाई रामनाथ कोळी उर्फ वैती यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१८/०५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

श्री.मुजावर कोर्ट
अर्जदाराचे वकील : ॲड.विजया रा. म्हात्रे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालय
दि.चौ.अर्ज क्र.६६८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०७/२०२२

सौ.शकुंतला कांचन पाटील
वय : ५५ वर्षे, व्यव : गृहिणी
मु.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
१) श्री.रामभाऊ नारायण नाईक
वय : ६२ वर्षे, व्यव : शेती
२) श्री.लक्ष्मण नारायण नाईक
वय : ६० वर्षे, व्यव : शेती
३) शानुबाई रामनाथ करावकर
वय : ६५ वर्षे, व्यव : गृहिणी
सामनेवाला नं.१ ते ३ सर्व रा.कोल्ही कोपर, ता.पनवेल, जि.रायगड
४) बयोबाई किसन पारगावकर
वय : ७० वर्षे, व्यव : गृहिणी
मु.तरघर, ता.पनवेल, जि.रायगड
५) गणाबाई महादेव पाटील
वय : ६५ वर्षे, व्यव : गृहिणी
मु.पाटणोली, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.आशाबाई दिपक घरत
वय : ५० वर्षे, व्यव : गृहिणी
रा.चिर्ले, ता.उरण, जि.रायगड सामनेवाले

या जाहीर नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील अर्जदार नं.१ व सामनेवाला नं.१ ते ६ यांची आई कै.साखरुबाई नारायण पाटील पुर्वाश्रमीची साखरुबाई पिलाजी तारेकर ह्या दि.०२/०२/२०१६ रोजी मौजे : कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. यांचे नावे असणाऱ्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीची ह्या सरकारतर्फे सिडकोने ''नव्या मुंबई'' योजनेसाठी भूसंपादीत केल्या आहेत. त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

मिळकतीचे वर्णन
मौजे : पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड

अ.क्र.	मौजे / युनिट केस	सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१	पारगांव/९६	२	२	०–१७–९	---
		५	३	०–२७–८	---

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदाराने मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार व सामनेवाला हे कै.साखरुबाई नारायण नाईक पुर्वाश्रमीची साखरुबाई पिलाजी तारेकर यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्टात अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८ माहे ०५ सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.राव साहेब कोर्ट
अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.७४७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०७/२०२२

१) श्रीमती.भामाबाई कमळाकर कोळी, वय : ६७ वर्षे
रा.बिल्डींग नं.५४, आचार्य मार्ग, गरीब
भारतीय रहिवासी संघ, सुभाष नगर,
चेंबुर, मुंबई ४०००७१
२) श्री.शंकर कमळाकर कोळी, वय : ५५ वर्षे
रा.रुम नं.२०४, साई–अपर्ण बिल्डींग,
सेक्टर क्र.३, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ,
बेलपाडा, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.वासुदेव उर्फ वासु कमळाकर कोळी, वय : ४९ वर्षे
रा.गणेशपुरी, पो.उलवा, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.विठ्ठाबाई सुनील कोळी, वय : ४८ वर्षे
रा.दिवाळे कोळीवाडा, पो.कोकणभवन, ता.बेलापूर, जि.ठाणे
५) श्री.विनोद कमळाकर कोळी, वय : ४४ वर्षे
रा.बिल्डींग नं.५४, आचार्य मार्ग, गररीब भारतीय
रहिवासी संघ, सुभाष नगर, चेंबुर, मुंबई ४०००७१
६) निर्मळा वसंत कावळे (मयत) वारसदार :
६/१) सौ.दिपाली उदय पगडे, वय : ३४ वर्षे
रा.घर नं.८४७ बी, देवद, पो.ओ.एन.जी.सी.,
ता.पनवेल, जि.रायगड
६/२) सौ.वैशाली भगवान कोळी, वय : ३२ वर्षे
रा.मुकूंद स्कूलच्या बाजूला, सुभाष नगर, चेंबुर, मुंबई ४०००७१
६/३) श्री.रुपेश वसंत कावळे, वय : २९ वर्षे
रा.घर नं.१०, हनुमान मंदिराजवळ, मोठा खांदा,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.कमळ नथ्या कोळी उर्फ कमळाकर नथुराम कोळी हे दि.०३/०७/२०२० रोजी मौजे : उलवे नोड, ता.पनवेल येथे मयत झाले आहेत. त्यांची मुलगी कै. निर्मला वसंत कावळे ही दि.१८/०१/१९९५ रोजी मयत झाली आहे. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

मिळकतींचे वर्णन

युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हि.नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.
ओवळे–२९६	११५	५	०–०८–३
	११६	८	०–२३–५
	१२९	१०	०–०३–०

सदर मिळकतींचे संपादनाच्या मोबदल्यात खालील वर्णनाचा भूखंड वाटप झालेला आहे.

भूखंडाचे वर्णन

स्थळ	सेक्टर क्रं.	भूखंड क्रं.	क्षेत्र चौ.मीटर
पुष्पकनगर–दापोली	८	१३४ ए	५५०

अर्जदार हे कै.कमळ नथ्या कोळी उर्फ कमळाकर नथुराम कोळी यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१८/०५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

मुळेखंडफाटा येथे ज्येष्ठ नागरिक मंडळ व लायन्स क्लबच्या वतीने आरोग्य शिबीर

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक मंडळ,मुळेखंड, तेलीपाडा, कोळीवाडा, कुंभारवाडा परिसर यांनी काल मधुमेह व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन मुळेखंडफाटा येथील खोपनदेव येथे करण्यात आले होते. या शिबिराला ज्येष्ठ नागरिकांनी प्रतिसाद देत तपासणी करून घेतली हे शिबीर लायन्स क्लब उरण यांच्या संयुक्त विद्यमाने भरविण्यात आले होते.

शिबिराचे उदघाटन उरण पंचायत समितीचे माजी सभापती ॲड. सागर कडू यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी लायन्स क्लबचे सदानंद गायकवाड, ॲड. दत्तात्रेय नवाळे, नरेंद्र ठाकूर तर सामाजिक कार्यकर्ते जयवंत पाटील यांच्या सह मंडळाचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, अनंत पाटील, जगदीश पाटील, परशुराम पाटील, ईशवर म्हात्रे, गोपीनाथ मांडलकर, अशोक म्हात्रे, केशव म्हात्रे आदी जण उपस्थित होते. यावेळी नेत्र रोग तज्ञ डॉ. शुभदा कुडतरकर व मधुमेह तज्ञ डॉ.जयराज मिश्रा यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी रुग्णाची तपासणी केली.

मुरुड तालुका कृषी विभागातर्फे चोरढे येथे शेतीशाळा प्रशिक्षण संपन्न

दै.रायगड नगरी । कोर्लई

मुरुड तालुका कृषी विभागातर्फे चोरढे येथे मंडळ कृषी अधिकारी व्ही.डी.अहिरे यांच्या मार्गदर्शनात शेतीशाळा प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाची सुरुवात शेतीशाळा प्रार्थनेद्वारे करण्यात आली.यावेळी शेतकऱ्यांना भात पिकाची उगवण क्षमता, चाचणी प्रात्यक्षिक आणि भात बियाण्याला मिठाच्या द्रा-वणाची, रासायनिक आणि जैविक बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी, जमिनीची पूर्वमशागत रोपवाटिका तयार करणे व रोपवाटिकेची काळजी घेणे.याबाबत मंडळ कृषी अधिकारी व्ही.डी.अहिरे यांनी सविस्तर मार्गदर्शन करुन शेतकऱ्यांचा शंकांचे निरसन केले. तसेच भात पिक विमा, आरोग्य पत्रिकेनुसार खतांचा वापर आणि १० टक्के खतांची बचत याविषयी सविस्तर मार्गदर्शन मा. तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ यांनी करून सर्व शेतकऱ्यांनी भात पिक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन यावेळी केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विशाल चौधरी व मनोज कदम यांनी केले.

माधव भंडारींना पत्रकार परिषद घेण्यासाठी मुंबई सोडून पनवेलला का यावे लागते? : सुदाम पाटील

केतकी चितळेला पाठिंबा देण्यासाठीच त्यांनी पनवेलमध्ये पत्रकार परिषद घेतली

दै.रायगड नगरी । पनवेल

भाजपचे महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवक्ते माधव भंडारी यांचा कार्यकाल आणि त्यांचे वय पाहता त्यांची कीव येते. कारण ६७ वर्षांचे गृहस्थ मुंबईला पत्रकार परिषद घेण्याचे सोडून पनवेलला पत्रकार परिषद घ्यायला येतात; म्हणजे पनवेलच्या राजकारणात काही उलथापालथ होण्याची भीती वाटते म्हणून ते याठिकाणी येत आहेत का? असा प्रश्न पडतो. शरद पवार यांच्याविरोधात कोणीही ऊठसूट बोलले की भाजप त्याला उचलून घेते. माधव भंडारी म्हणतात की, अभिनेत्री केतकी चितळेला ओळखत नाही. परंतु केतकी चितळेला एकप्रकारे पाठिंबा देण्यासाठीच त्यांनी पनवेलमध्ये पत्रकार परिषद घेतली, असा पलटवार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील यांनी केला.

भाजपचे मुख्य प्रवक्ते माधव भंडारी यांनी मंगळवारी (दि.१७ मे) दुपारी पनवेलमध्ये आयोजित केलेल्या परिषदेत राज्य सरकार आणि राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यावर सडकून टीका केली. या टीकेला उत्तर देण्यासाठी मंगळवारी संध्याकाळी कळंबोली येथील एका कार्यक्रमात सुदाम पाटील यांनी पलटवार केला. माधव भंडारी हे भाजपच्या पहिल्या फळीतील नेते असूनही पक्षाने त्यांना कुठेतरी दूर ठेवले आहे. पक्षाचे केवळ प्रवक्ते म्हणून त्यांच्या हातात गाजर दिलेले आहे. त्या गाजराने त्यांचे पोट भरत नाही म्हणून ते पनवेलला येऊन शरद पवार यांच्याबद्दल टीका करण्यासाठी पत्रकार परिषद घेत आहेत. जेणेकरून भविष्यात विरोधीपक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून विधानसभा, लोकसभा किंवा अन्य काहीतरी मोठी जबाबदारी मिळण्याची दिवास्वप्न त्यांना पडत असावीत म्हणूनच ते पनवेलमध्ये येत असल्याची टीका सुदाम पाटील यांनी केली.

सुदाम पाटील पुढे म्हणाले की, मुळातच महाराष्ट्रात एक अशी प्रथा निर्माण झाली आहे की, देशाचे नेते शरदचंद्र पवार यांचे नाव घेऊन तोंडसुख नाही घेतले; तर पक्षामध्ये आपली प्रगतीच होऊ शकत नाही असे काहींना वाटते. परंतु शरद पवार यांच्या घरावर हल्ला झाला त्यावेळी सुद्धा त्यांनी सर्वांना शांततेचे आवाहन केले. केतकी चितळेला कोणीही ओळखत नाही त्यामुळे तिच्याबद्दल भाष्य करून तिला मोठे करण्यात अर्थ नाही. आणि तिच्यावर हल्ला करण्याचा काही प्रश्नच येत नाही. सीरिअल्स, नाटक, सिरीज काहीही मिळत नसल्याने चित्रपटसृष्टीतून पूर्णपणे बाद झालेली ती एक सिनेतारका आहे.

त्यामुळे आपल्या उदरनिर्वाहासाठी ती वायफळ शक्कल लढवून देशाचे नेते शरद पवार यांच्यावर तोंडसुख घेण्याची विकृती तिला सुचली. जेणेकरून आगामी काळात भाजपमधील कोणीतरी निर्माते तिला कामे देतील असा तिचा भ्रम झाला असावा. त्यामुळे अल्पावधीतच कष्ट न करता पुढे जाण्यासाठी तिने केलेला हा बालहट्ट आहे, असेही ते म्हणाले.

प्लास्टिक बंदीसाठी सरसावले काशीद जनजागृती अभियान संपन्न

दै.रायगड नगरी । अलिबाग

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील व उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानदा फणसे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायती व अनेक स्वयंसेवी संस्था यांच्या सहयोगातून जिल्ह्यात घनकचरा व्यवस्थापनासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. आम्ही संस्था, मुंबई यांच्या वतीने काशीद बीचवर नुकताच प्लास्टिक बंदीसाठी जनजागृती मेळावा संपन्न झाला.

यावेळी काशीद च्या सरपंच सौ.नम्रता कासार, मुरुडचे गटविकास अधिकारी श्री.सुभाष वाणी, आम्ही संस्थेच्या प्रमुख श्रीमती परेरा व श्रीमती किरण पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड म्हणाले, नागरिकांनी सवयी बदलून ओला व सुका कचरा वेगळा करणे आवश्यक आहे. प्लास्टिक नष्ट होत नाही, शिवाय प्लास्टिक खाल्ल्याने समुद्रातील मासे व जनावरेही मृत होतात, हे सर्व दुष्परिणाम आटोक्यात आणण्यासाठी काशीदचे ग्रामस्थ, आम्ही संस्था व पर्यटक यांच्या एकत्रित प्रयत्नातून प्लास्टिक बंदीचा उपक्रम यशस्वी करून काशीदचा वेगळा आदर्श निर्माण करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविले जात आहेत.

यावेळी आम्ही संस्थेच्या प्रमुख श्रीमती परेरा म्हणाल्या, प्लास्टिक संकलनासाठी आम्ही संस्थेतर्फे व्यावसायीकांना ओला व सुका कचरा संकलनासाठी दोन डस्टबिन दिल्या आहेत. तसेच आठवड्यातून तीन वेळा काशीद व नांदगाव या दोन ग्रामपंचायतींमधून किमान ६ हजार किलो सुका कचरा संकलन करून पुर्नप्रक्रियेसाठी पाठविला जातो. श्री.शहाजी जाधव यांनी प्लास्टिक चे दुष्परिणाम व आम्ही संस्थेतर्फे राबविण्यात आलेले उपक्रम याची सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने सरपंच सौ.नम्रता कासार यांनी ग्रामपंचायत प्लास्टिक बंदीसाठी कटिबद्ध असून ग्रामस्थांनीही कापडी पिशव्यांचा वापर वाढविण्याचे तसेच पर्यटकांनी परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले.

यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या चाकोरीच्या पलीकडे ही माहिती पुस्तिका आम्ही संस्थेच्या प्रतिनिधी श्रीमती किरण पटेल व सरपंच सौ.नम्रता कासार यांना देण्यात आल्या.

ग्रामपंचायत कर्मचारी श्री.सुर्यकांत जंगम यांनी प्रास्ताविक केले. संवाद तज्ञ श्री.सुरेश पाटील यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य श्री.संतोष राणे, ग्रामसेवक श्री.अविनाश पिंपळकर, गट समन्वयक श्रीमती श्रेया गद्रे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मडके कारागीर व व्यावसाईकांना पुन्हा सुगीचे दिवस; उन्हाच्या काहिलीने वाढती मागणी

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

उन्हाच्या काहिलीने सारेच बेजार झालेत. मात्र अशातच मडक्यातील थंडगार पाणी वेगळेच सुख समाधान देत तहान भागवतेय. या गरिबांच्या या फ्रिजला आता मागणी वाढतेय.

मागील वर्षीपेक्षा यावर्षी मडक्यांच्या किंमती वधारल्या असून जिल्ह्यात सध्या उन्हाचा तडाखा वाढला आहे. त्यामुळे कोरडा पडलेला घसा ओला करण्यासाठी फ्रिज पेक्षा मातीच्या मडक्यातील (माठाच्या) थंडगार व चविस्ट पाण्यालाच अनेक जण पसंती देतात. त्यामुळे सध्या मातीच्या मडक्यांना खूप मागणी आहे. परिणामी हे बनवीणाऱ्या कारागीर, विक्रते व व्यावसाईकांना सुगीचे दिवस आले आहेत. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा किंमती ३० ते ४० टक्क्यांनी वधारल्या आहेत.

मागील दोन वर्ष कोरोना व लॉकडाऊनमुळे व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाला होता. यंदा दिलासादायक स्थिती असून फ्रिज पेक्षा मातीच्या मडक्यांना अधिक मागणी आहे. त्यामुळे व्यवसाय देखील चांगला होत आहे. असे पालीतील कारागीर नारायण कुंभार यांनी सांगितले. विविध आकार, रंग, पोत व किंमतीची असलेली मडकी बाजारात उपलब्ध आहेत. लहान, मध्यम व मोठ्या आकाराचे मडके मिळते.

त्याबरोबरच यांना नळाचा कॉक लाव-लेले, तसेच झाकण असलेली मडकी विविध रंगानी नक्षिकाम केलेली मडकी देखील उपलब्ध आहेत. त्यांच्या किंमती आकार आणि त्यावरील नक्षिकामावर ठरतात. खालुन गोल असलेल्या मडक्यांसाठी स्टैंडची गरज असते. हे स्टँड देखील सध्या ८० - ९० रुपयांत विक्रेत्यांकडे उपलब्ध आहेत.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

सर्पमित्र संदीप घरत यांनी दिले सहाफुटी नागाला जीवदान

घरमालकाच्या सतर्कतेमुळे वाचले नागाचे प्राण

दै.रायगड नगरी । कोर्लई

मुरुड तालुक्यातील नांदगाव वाघेश्वर नगर येथे स्वामीक चौलकर यांच्या घरात घुसलेल्या ६ फुटी नागाचे प्राण मालकाच्या सतर्कतेमुळे वाचले असून सर्पमित्र संदीप घरत यांनी आपल्या कौशल्याने नागाला सुरक्षितपणे पकडून वनविभागाच्या सहकार्याने जवळिल जंगलात सोडून जिवदान दिल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

नागेश्वरनगर येथे स्वामीक चौलकर यांच्या घरात भला मोठा ६ फुटी नाग घु-सून दडून बसला असल्याचे घरमालकाच्या लक्षात आले. तेव्हा आजुबाजुच्या लोकांनी एकच गर्दी केली होती.

इतक्या मोठ्या नागाला काही लोकांनी मारण्याचा प्रयत्न केला होता. परंतु घरमालकाने विरोध करत अथक प्रयत्नाने सर्पमित्र संदीप घरत यांचा मोबाईल नंबर मिळवून त्यांना संपर्क करुन बोलावून घेतले.

सर्प मित्र संदिप घरत यांनी क्षणाचा विलंब न करता तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व मोठ्या शिताफीने आपल्या कौशल्याने त्या ६ फुटी नागाला जेरबंद केले नंतर वनखात्याच्या सहाय्याने या नागाला जंगलात जाऊन सोडून दिल्याबद्दल संदीप घरत यांचे कौतुक होत आहे. जर अशा प्रकारे कोणाला कोणताही सर्प आढळून आल्यास नजिकच्या वनखात्याशी संपर्क साधावा. या मुक्या प्राण्यांना मारु नये. असे आवाहन सर्प मित्र संदिप घरत यांनी केले आहे.

ज्वेलर्स दुकानातुन सोन्याच्या वस्तु चोरून नेणाऱ्या तिघांना अटक

दै.रायगड नगरी । पनवेल

सोने खरेदी करण्याच्या बहाण्याने ज्वेलर्स चालकाला दागिने दाखवायला सांगायचे आणि ते चोरून न्यायचे याबाबत खांदेश्वर आणि कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

कामोठे येथील राधिका ज्वेलर्स नावाचे दुकान असून यावळी आरोपींनी सोने खरेदी करण्याचा बहाणा करून या दुकानात अडतीस ग्राम सोन्याचे मंगळसूत्र चोरुन नेले. तर खांदा कॉलनी सेक्टर १० येथील कृष्णदेव सूर्यवंशी यांच्या ज्योतिर्लिंग ज्वेलर्समध्ये दोन अनोळखी महिला सोन्याच्या डोरले यांच्या वाट्या खरेदी करण्यासाठी आल्या. वाट्या दाखवत असताना ती पाहिली व आवडली नाही असे बोलून वस्तू ठेवल्यासारखे करून त्या निघून गेल्या. दुकानातील स्टॉक चेक केला असता वीस हजार रुपये किमतीची सोन्याची वाटी सापडून आली नाही.

याबाबत खांदेश्वर आणि कामोठे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याच्या तपासा दरम्यान कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता जाधव, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश महाला, निलेश पवार, योगेश्वर ठाकूर, तुषार चौधरी व त्यांच्या टीमने सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली.

कामोठे पोलिसांनी बदलापूर येथून संगीता सुदर्शन खीची (वय ४९), सुनील प्रकाश साळुंखे (वय ४१) व विनोद प्रकाश साळुंखे (४८ सर्व रा. बदलापूर, कात्रप) यांना अटक केली. त्यांच्याकडून कामोठे, खांदेश्वर आणि डोंगरी पोलीस स्टेशन येथील गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून तिन्ही गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे

दापोली कृषी प्रदर्शनात सुधागड तालुक्यातील शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा ; विविध उपक्रमांचा घेतला लाभ

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली येथे आयोजित कृषी पालवी या कृषी प्रदर्शन व शेतकरी मेळाव्यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा नुकताच काढण्यात आला होता. कृषी विभाग कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कृषी प्रदर्शनात शेती मधील विविध माहितीविषयक प्रदर्शन, परिसंवाद, प्रात्यक्षिके आणि विद्यापीठ क्षेत्राचे दर्शन घडवणारी प्रदक्षिणा अशा विविधांगी उपक्रमांची मेजवानी येथील शेतकऱ्यांना मिळाली. शेतीमधील उत्पादनांच्या विक्री व्यवस्थेची शेतकऱ्यांना ओळख होण्यास तसेच कृषी विद्यापीठ, कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या इतर संस्था आणि शेतकरी यांच्यात समन्वय साधण्यात या मेळाव्याने महत्त्वाची भूमिका पार पाडली. या मेळाव्यातून विद्यापीठाचे गेल्या पन्नास वर्षांतील कार्य आणि संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे शक्य झाले आहे. असे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी आपल्या भाषणात सांगितले.

या अभ्यास दौऱ्यास सुधागड पाली तहसीलदार दिलीप रायण्णावार यांचे विशेष सहकार्य मिळाले. तसेच तालुका कृषी अधिकारी जे. बी. झगडे, श्री. हटकर, श्री. कोळी, कृषी सहाय्यक यांचे सुद्धा सहकार्य लाभले. या अभ्यास दौऱ्याचे नियोजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक प्राजक्ता पाटील व सुधागड कृषी मित्र संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या अभ्यास दौऱ्यात सुधागड तालुक्यातील शेतकरी संघटना, महिला बचत गट, प्रयोगशील शेतकरी, आदिवासी व भाजी उत्पादक महिला सहभागी झाल्या होत्या.

या दौऱ्यास तालुक्यातील कृषी संघटना, कृषी विज्ञान केंद्र किल्ला (रोहा) यांचे सहकार्य मिळाले. तसेच प्रायोगिक तत्त्वावर शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध करून आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान व अभ्यास करण्यासाठी डॉ. तलाठी, प्रमोद मांडवकर, डॉ. मांजरेकर, पाध्ये सर, गिते सर यांचे देखिल सहकार्य लाभले. या अभ्यास दौऱ्यात सुधागड तालुका कृषी मित्र संघटनेचे सचिव शरद गोळे, बळीराम निंबाळकर, महेश पोंगडे, प्रगतशील शेतकरी विराज लोंढे, बशिर परबळकर, संतोष भोईर, दिपक कोकरे, संजय पवार, दिनेश बुरूमकर, वैभव शिंदे, कल्पेश सावंत, भास्कर दुर्गे, प्रभावती हंबीर, महिला बचत गट व कुकुटपालन कडधान्य उत्पादक यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

कवी संमेलन उत्साहात साजरा

दै.रायगड नगरी । उरण

उरणमध्ये प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला उरण शहरातील विमला तलाव(गार्डन)येथे कोकण मराठी साहित्य परिषद व मधुबन कट्ट्याचे कविसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न होत असते. हे कवी संमेलन ज्येष्ठ नागरिकांसाठी पर्वणीच असते.

यावेळी दिनांक १७/५/२०२२ रोजी विमला तलाव येथील गार्डन मधील कवी संमेलनात ज्येष्ठ नागरिक कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळाराम पाटील यांनी विचार मांडले.

कविसंमेलन आणि जीवनगौरव असे दोन कार्यक्रम घेण्यात आले. जीवन थळी आणि मारुती तांबे यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन रंजना केणी यांनी केले. हे ७९ वे कविसंमेलन अत्यंत उत्साहात पार पडले.

या कविसंमेलनात रायगडभूषण प्रा.एल.बी. पाटील, किशोर म्हात्रे, मच्छिंद्र म्हात्रे, भगवान पोसू, संग्राम तोगरे, अरुण म्हात्रे, वसंत राऊत, अमोल पाटील इत्यादींचे कविता वाचन झाले. यावेळी संजय केणी, सुर्यकांत दांडेकर, चंद्रकांत मुकादम, अनंत पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.